# इंटरनेटवर आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांचा वापर

**जून १८, २००२**

भारतीय रिझर्व्ह बँकेने परिपत्रक एपी (डीआयआर सिरीज) क्र.१८, दिनांक ऑक्टोबर ३०, २००० मधील परिच्छेद ३ मध्ये सांगितले आहे की क्रेडिट कार्डस एटीएम कार्डस, डेबिट कार्डस, या केवळ पैसे देण्याच्या विभिन्न पद्धती असल्यामुळे, फॉरेन एक्सचेंज मॅनेजमेंट ॲक्ट (फेमा) १९९९ मधील सर्व नियम/अधिनियम व आदेश हे क्रेडिट कार्डे, एटीएम कार्डे व डेबिट कार्डे इ. ना सुद्धा लागू होतात. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांचा इंटरनेटवर वापर करण्याच्या योग्य उपयोगांच्या बाबतीत स्पष्ट करण्यात येत आहे की –

(१) इंटरनेट वर आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे कोणत्याही अशा कारणांसाठी वापरता येतील, की ज्यासाठी, भारतामधील अधिकृत विक्रेत्यांकडून परदेशी चलन विकत घेता येत; उदा. पुस्तकांची खरेदी, डाऊनलोड करण्यायोग्य सॉफ्टवेअरची खरेदी, किंवा एक्झिम धोरणांरर्गत आयात करता येत असलेल्या कोणत्याही वस्तूची आयात

(२) आतंरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे इंटरनेट किंवा इतर कुठेही, बंदी घातलेल्या वस्तूंच्या खरेदी साठी वापरता येणार नाहीत, उदा. लॉटरी तिकिटे, बंदी घातलेली नियतकालीके, स्वीपस्टेक्स मधील सहभाग, कॉल-बॅक सेवांसाठीचे पैसे इ., कारण अशा वस्तू / कृतींसाठी परकीय चलन घेण्यास परवानगी नाही.

(३) इंटरनेटवर आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डांच्या वापरासाठी कोणतीही वेगळी कमाल आर्थिक मर्यादा घातलेली नाही.

स्पष्ट करण्यात येत आहे की, डेबिट कार्डे व ए टी एम कार्डे सुद्धा कोणत्याही अशा कारणांसाठी वापरता येतील की ज्यांसाठी भारतातील अधिकृत विक्रेत्यांकडून परकीय चलन खरेदी करता येते. अधिकृत विक्रेत्यांना भारताबाहेर निर्यातीसाठीचे प्रदान सुद्धा डेबिट कार्डे व ए टी एम कार्डांद्वारे स्वीकारण्याची परवानगी आहे. यासाठीचे मार्गदर्शक नियम रिझर्व्ह बँक अलगपणे जारी करीत आहे.

**अजित प्रसाद**
**व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज : २००१-२००२/१३९२**